साहसे श्री: प्रतिवसति।

अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीचे

# कला, वाणिज्य व दादासाहेब रुपवते विज्ञान महाविद्यालय

अकोले - ४२२ ६०१, जि. अहमदनगर

नॅक मानांकन B++

सर्वोत्कृष्ट ग्रामीण महाविद्यालय पुरस्कार (२००६-०७)

अगस्त्य नियतकालिक (२००५-०६) विद्यापीठस्तरीय द्वितीय क्रमांक पुरस्कार




प्रकाशक

प्राचार्य रमेशचंद्र खांडगे


संपादक

प्रा. डॉ. विजय बाणकर

# अगस्त्य

२००६ - ०७

*Truth of being must govern truth of life.* - Shri Aurobindo



डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम
मा. राष्ट्रपती



श्री. एस्. एम्. कृष्णा
महामहिम राज्यपाल



डॉ. नरेंद्र जाधव
(समर्थ भारत अभियानाचे प्रणेते.)

## समर्थ भारत अभियान गीत

चला चेतवू अंत:प्रज्ञा समर्थ बनण्यासाठी
स्मरू हुतात्मे आणि महात्मे समर्थ बनण्यासाठी
द्वेष, मत्सरा गाडून टाकू समर्थ बनण्यासाठी
देऊ झुगारून वर्ग वर्ण ते समर्थ बनण्यासाठी
समर्थ बनण्यासाठी .....

हात पसरणे बंद करू या समर्थ बनण्यासाठी
स्वावलंबने कामी लागू समर्थ बनण्यासाठी
कंबर कसूया नव्या दमाने समर्थ बनण्यासाठी
वळण लावूया सळसळत्याला समर्थ बनण्यासाठी
समर्थ बनण्यासाठी .....

तळातूनी आरंभ करू या समर्थ बनण्यासाठी
वंचितांना आधार देऊ समर्थ बनण्यासाठी
श्रमप्रतिष्ठा पुन्हा जपू या समर्थ बनण्यासाठी
विश्वासार्हता जपू नव्याने समर्थ बनण्यासाठी
समर्थ बनण्यासाठी....

न्युनगंडाला लावू उधळून समर्थ बनण्यासाठी
अस्मितेची करू जपवणूक समर्थ बनण्यासाठी
बाह्य-बलांची नको प्रतीक्षा समर्थ बनण्यासाठी
स्वयंप्रेरणे आता उठू या समर्थ बनण्यासाठी
समर्थ बनण्यासाठी....

पुनर्बांधणी करू जोमाने समर्थ बनण्यासाठी
मनगट-मनगट एक करूया समर्थ बनण्यासाठी
सर्व पणाला लावू आता समर्थ बनण्यासाठी
या मातीशी इमान राखू समर्थ बनण्यासाठी
समर्थ बनण्यासाठी....

जनसहभागा हाक देऊया समर्थ बनण्यासाठी
ग्रामविकासा हात देऊया समर्थ बनण्यासाठी
मिळून मिसळूनी मार्ग काढू या समर्थ बनण्यासाठी
**समर्थ भारत अभियान हे समर्थ बनण्यासाठी**
**समर्थ बनण्यासाठी....**

- प्राचार्य डॉ. अरूण अडसूळ,
विद्याप्रतिष्ठान महाविद्यालय, बारामती.

## समर्थ भारत अभियान

देखा अब्दुल कलाम ने, समर्थ भारत ख्वाब
पूरा करने ख्वाब को कस लो कमर जनाब

नाता जोडो गांव से रिश्ता इक अनजान
पूना विद्यापीठ का, होय सफल अभियान

पेड़ लगाओ जान के, उनमें भी है जान
खाना पीना मांगता, उनका हर इक पान

'सब शिक्षित' अभियान का, स्विकारो आव्हान
घर घर पहूँचे इल्म ये, हो जारी फरमान

पाप व भ्रष्टाचार का, करना है अपमान
व्यसन मुक्त जवान हो, भारत का अभिमान

ऊर्जा पानी जान लो, कीमती है सामान
खचो मत बेकार में, जीना हो आसान

गीता और कुरान से, मिलती सीख महान
भाईचारे से रहो, दे दो देश पे जान

जीती नारी शान से, पाती है सम्मान
ऐसी मेरे देश की, नारी शक्तिमान

सर्वांगीन विकास से, मिलता है सन्मान
उन्नत विकसित भाल से, देश की बढती शान

आओ मिलके काम ले, करे सफल अभियान
समर्थ भारत ख्वाब से, देश चढे परवान !

- प्राचार्या मनोरमा कामले
आर्ट्स, सायन्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज (फॉर विमेन) मालेगांव, जि. नाशिक

(पुणे विद्यापीठ 'समर्थ भारत अभियान' कार्यपुस्तिकेतून उद्धृत.)



A-6

ARTS & COMM. COLLEGE

अगस्त्य

साहसे श्रीः प्रतिवसति ।

स्थापना १/७/१९७४

नॅक मानांकन B++

अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीचे

# अगस्ति कला, वाणिज्य व दादासाहेब रूपवते विज्ञान महाविद्यालय, अकोले

ता. अकोले, जि. अहमदनगर

पिन : ४२२ ६०१

(दूरध्वनी : ०२४२४-२२१२४८)

# ।। अगस्त्य ।।

## नियतकालिक

२००६-०७

प्रकाशक

प्राचार्य रमेशचंद्र खांडगे

संपादक

प्रा. डॉ. विजय बाणकर

The luxury of doing good surpasses every other personal enjoyment. - *Gay*



# अगस्त्य

◌ **प्रकाशक** ............

**प्राचार्य रमेशचंद्र खांडगे,**
अगस्ति कला, वाणिज्य व
दादासाहेब रूपवते विज्ञान महाविद्यालय,
अकोले, जि. अहमदनगर.

◌ **संपादक** ............

**प्रा. डॉ. विजय बाणकर**

◌ **संपादक मंडळ** ............

प्रा. संजय पगारे
प्रा. नंदकुमार रासने
प्रा. डॉ. सौ.अकिला शेख
प्रा. केशव नाईकवाडी
प्रा. डॉ. बाबासाहेब देशमुख
प्रा. डॉ. शिवाजी खेमनर (अध्यक्ष, विद्यार्थी मंडळ; वरिष्ठ महाविद्यालय)
प्रा. डॉ. सुनील शिंदे
प्रा. ओंकार राठी
प्रा. प्रकाश जगताप (अध्यक्ष, विद्यार्थी मंडळ; कनिष्ठ महाविद्यालय)

◌ **विशेष सहाय्य** ............

प्रा. गोरक्ष शिरसाट, उपप्राचार्य, कनिष्ठ महाविद्यालय
प्रा. डॉ. अनिरुध्द वांगडे, पर्यवेक्षक, कनिष्ठ महाविद्यालय
श्री. लक्ष्मीकांत आगलावे (प्रबंधक)
श्री. प्रविण घुले (सहाय्यक ग्रंथपाल)

◌ **मुखपृष्ठ व मलपृष्ठ संकल्पना** ............

प्रा. डॉ. विजय बाणकर
श्री. सुजित गुलाब नवले

◌ **अक्षर जुळणी, फोटोसेटिंग, प्रिंटींग व डिझायनिंग** .....

श्री. सुजित व सचिन गुलाब नवले
**सुजाता ऑफसेट प्रिंटर्स, राजूर/अकोले**
दूरध्वनी : (०२४२४) २५१४२२,
भ्रमणध्वनी : ९४२३४६७२१२/९९६०३७२४१२

## वार्षिक नियतकालिक

२००६-०७

दि प्रेस ॲण्ड रजिस्ट्रेशन ऑफ बुक्स् नियम ८, फॉर्म ४
प्रमाणे आवश्यक माहिती

**प्रकाशन स्थळ** :- अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीचे अगस्ति कला, वाणिज्य व दादासाहेब रूपवते विज्ञान महाविद्यालय, अकोले, जि. अहमदनगर.

**प्रकाशन काळ** :- वार्षिक

**प्रकाशक** :- प्रा. रमेशचंद्र खांडगे

**पत्ता** :- अगस्ति कला, वाणिज्य व दादासाहेब रूपवते विज्ञान महाविद्यालय, अकोले, जि. अहमदनगर.

**संपादकाचे नांव** :- प्रा.डॉ. विजय बाणकर

**राष्ट्रीयत्व** :- भारतीय

**मालकी** :- अगस्ति कला, वाणिज्य व दादासाहेब रूपवते विज्ञान महाविद्यालय, अकोले, जि. अहमदनगर.

मी प्रा. रमेशचंद्र खांडगे जाहीर करतो की,
वर दिलेली माहिती माझ्या समजूतीप्रमाणे बरोबर आहे.

**प्राचार्य रमेशचंद्र खांडगे,**
प्रकाशक

»»»»»»»» ««««««««

**सदर अंकात प्रसिद्ध करण्यात आलेल्या साहित्यातील मतांशी संपादक मंडळ व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.**

अनंत विश्वाशी अखंड एकरूप असलेले

**श्रीसद्‌गुरू**

आणि

**वाचकरूपी जनता-जनार्दन**


यांचे चरणीं

हा

अंक

समर्पित

असो !





'गारंबीचा बापू', 'तुंबाडचे खोत', 'रथचक्र'
अशा सकस / सरस कादंबऱ्या लिहून
मराठी रसिक मनावर अधिराज्य गाजविणारे
विख्यात साहित्यिक

**श्री. ना. पेंडसे**

यांचे दि. २३ मार्च २००७ रोजी निधन झाले.
जगण्याच्या तळापर्यंत पोचणारा,
सर्जनशील माणसांच्या वेदनांचा शोध घेणारा
कलावंत, साहित्यिक म्हणजे
श्री. ना. .....!
त्यांना
भावपूर्ण

श्रद्धांजली


याशिवाय
गेल्या शैक्षणिक वर्षात जे जागतिक कीर्तीचे साहित्यिक, शास्त्रज्ञ, अर्थतज्ज्ञ, विचारवंत, राजकीय व सामाजिक कार्यकर्ते, शिक्षणतज्ज्ञ, शिक्षक, कलावंत, संस्थेवर प्रेम करणारे स्नेही, हितचिंतक कालवश झाले त्यांच्या आत्म्यास आमचे विनम्र अभिवादन व भावपूर्ण श्रद्धांजली ..!!

आपल्या महाविद्यालयाचा एक हुशार व होतकरू विद्यार्थी **सचिन दळवी** (द्वितीय वर्ष, कला [ भूगोल ]) हा अगदी अनपेक्षितपणे कालवश झाला. त्याच्या कुटुंबीयांच्या दु:खात आम्ही सर्व सहभागी आहोत. ईश्वर त्याच्या जीवात्म्यास सद्‌गती देवो...!

We honour the illustrious dead best by following their example. - *Mahatma Gandhi.*







# अंतरंग


माजी प्राचार्यांचे 'मनोगत'
प्राचार्यांचे मनोगत
संपादकीय
'उत्कृष्ट' विभाग
कला विभाग
वाणिज्य विभाग
विज्ञान विभाग
अहवाल
वैयक्तिक कामगिरी
कर्मचारी वृंद


What is expressed is only a part of what is behind. - *Shri Aurobindo.*



# माजी प्राचार्यांचे 'मनोगत'

महाविद्यालयाने प्रकाशित केलेल्या द्वितीय नियतकालिकामधील (१९७६-७७)
प्राचार्य एम्. डी. कऱ्हाडकर यांच्या मनोगतातील पहिला व शेवटचा परिच्छेद !

**ज्यांमध्ये अभिव्यक्त झालेले कार्यसूत्र आजही कार्यरत आहे !!**

## 'मनोगत'

प्राचार्य एम्. डी. कऱ्हाडकर

आमच्या या महाविद्यालयास १ जुलै १९७७ रोजी तीन वर्षे पूर्ण होत आहेत. आणि आम्ही चौथ्या वर्षात पदार्पण करीत आहोत. गेल्या दोन/तीन वर्षात आम्ही केलेल्या प्रगतीमुळे आणि संपादिलेल्या यशामुळे आमच्या महाविद्यालयाबद्दल अकोले तालुक्यातील पालकांमध्ये व तालुक्याबाहेरही, त्याचप्रमाणे पुणे विद्यापीठ कक्षेतील शिक्षणतज्ज्ञात एक प्रकारचे कुतूहल निर्माण झाले आहे. आमच्या महाविद्यालयातील विविध उपक्रमांच्या प्रगतीचा आढावा जाणून घेण्याचे औत्सुक्य आमची अकोलकर मंडळी या ना त्या प्रकारे दाखवीत असतात. सर्वजण आमच्याकडे आपुलकीने पाहतात. मदतीचा हात सदैव पुढे करतात व या शैक्षणिक कार्याला गती देतात याबद्दल फार मोठे समाधान वाटते. या नियतकालिकाच्या माध्यमातून महाविद्यालयाविषयी तालुक्यातील काना-कोपऱ्यात माहिती मिळावी, हा एकमेव उद्देश !

अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीचे
आर्ट्स अ‍ॅण्ड कॉमर्स कॉलेज, अकोले, जि. अहमदनगर

## नियतकालिक
## १९७६-७७

मी यथोचित अभिमानाने असे म्हणेन की, माझ्या महाविद्यालयातील सहकारी प्राध्यापक, कार्यालयीन सेवक, माझे विद्यार्थी व त्यांचे पालक व महाविद्यालयाचे व्यवस्थापकीय मंडळ इ. चे संपूर्ण सहकार्य माझ्या पाठीशी उभे असल्यामुळेच महाविद्यालयाची हितप्रद प्रगती करणे व विद्यार्थी कल्याणाचे उपक्रम हाती घेणे मला शक्य झाले, होत आहे व यापुढेही होणार आहेच. माझा असा दृढविश्वास आहे की आपण सर्वजण असेच सहकार्य व प्रेम देऊन मार्गदर्शन कराल तर या महाविद्यालयातील विद्यार्थी निश्चितपणे प्रगतीपथावरच जातील व अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीच्या या महाविद्यालयाचा प्रगतीचा ध्वजही सातत्याने उंचच ठेवतील.

धन्यवाद -

LIBRARY



'अगस्त्य'चा हा अंक आपल्या हाती देताना मला मनस्वी आनंद होत आहे. गुणवत्ता टिकवून ठेवीत 'अगस्त्य'ने गतवर्षी विद्यापीठस्तरीय द्वितीय क्रमांक मिळविला. यशाच्या शिखरावर जाणे आव्हानात्मक आणि अवघड असते; तेथे दीर्घकाळ टिकून राहणे हे त्याहूनही अधिक आव्हानात्मक व अवघड असते. 'अगस्त्य'चे संपादक डॉ. विजय बाणकर आणि त्यांचे संपादकीय सहकारी यांनी ही जबाबदारी पार पाडली, याचा मला सार्थ अभिमान आहे.

महाविद्यालयाला पुणे विद्यापीठाचा 'सर्वोत्कृष्ट संलग्न ग्रामीण महाविद्यालय' पुरस्कार मिळाला. श्री. जयराम पथवे या कर्मचाऱ्यासही 'गुणवंत शिक्षकेतर सेवक पुरस्कार' मिळाला. या पूर्वीही महाविद्यालयास अनेक पुरस्कार मिळाले आहेत. परिणामत: एक उपक्रमशील महाविद्यालय म्हणून पुणे विद्यापीठक्षेत्रात आपले नांव झाले आहे. मा. कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांच्या कल्पनेतून साकारत असलेल्या 'समर्थ भारत अभियानात' प्रत्येक महाविद्यालयाने आपल्या विद्यार्थीसंख्येइतकी रोपे तयार करणे अपेक्षित होते; आपण मात्र एक लाख रोपे तयार केली. महाविद्यालय हे केवळ शिक्षणाचेच केंद्र असू नये; तर, ते आपल्या परिसरातील सर्व क्षेत्रातील घटकांच्या व्यापक अपेक्षा पूर्ण करणारे व तरुणांचे व्यक्तिमत्त्व विकसित करणारे केंद्र असावे, असाच आपला प्रयत्न आहे. 'अगस्त्य' नियतकालिक हा या प्रयत्नाचाच एक भाग आहे.

महाविद्यालयीन नियतकालिकातील नेहमीची सदरे व मजकूर यांशिवाय वैविध्य व नावीन्यपूर्ण एक बौध्दिक मेजवानी देण्याचा प्रयत्न इथे केला आहे. महाविद्यालयाचे मानद वैद्यकीय अधिकारी डॉ. शिवाजीराव बंगाळ यांचा 'लैंगिक शिक्षण, का व कसे ?' हा लेख म्हणजे एका अत्यंत महत्त्वाच्या विषयाला अभ्यासूपणे भिडण्याचा एक प्रयत्न आहे.


महाविद्यालय हे एक कुटुंब असते. त्यातले काही सहकारी हे व्यवस्थापनाचा बराचसा भार 'स्वान्ताय सुखाय' उचलीत असतात. 'अगस्त्य'चे संपादक डॉ. विजय बाणकर हे असेच एक व्यक्तिमत्त्व आहे. त्यांचे अथक परिश्रमातून हे 'अगस्त्य' साकारले आहे. त्यांनी 'सूचित' केल्याप्रमाणे 'अगस्त्य'च्या अंतरंगात आपण डोकवाल व त्यांच्या प्रयत्नांना योग्य ती दाद द्याल, या अपेक्षेसह हा अंक आपणास सादर करीत आहे.

प्राचार्य रमेशचंद्र खांडगे

The greatest pleasure in life is doing what people say you cannot do. - *Walter Bagehot.*

# संपादकीय....!

संपादकीय....!



**प्रिय विद्यार्थी व वाचक मित्रहो,**

**संपादक म्हणून मला जे म्हणावयाचे होते ते लिओ टॉलस्टॉय यांच्या पुढील शब्दात व्यक्त झाले आहे -**

अनेकदा पुनर्लेखन केल्याशिवाय एखादा माणूस एखादी गोष्ट कशी पूर्ण करू शकतो ते मी समजू शकत नाही. माझ्या लेखांचे मी क्वचितच पुनर्वाचन करतो; परंतु एखादे पान मला खटकते आणि वाटत राहते,

‘हे सारं असं लिहावयास हवं होतं,
हे सारं पुन्हा आणखी व्यवस्थित लिहावयास हवेच.’

**प्रा.डॉ. विजय बाणकर**

I think we must... quote whenever we feel that the allusion is interesting or helpful or amusing. - Clifton Fadiman.





# 'उत्कृष्ट' विभाग

The first great gift we can bestow on others is a

**GOOD EXAMPLE.**

*- Morell*